**<u>ठाणे महानगरपालिका,ठाणे.</u>**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक १०.०६.२०१४

ठाणे महानगरपालिकेच्या **सर्वसाधारण** सभेची सूचना.
सभा सूचना क्रमांक ०२ दिनांकः १०.०६.२०१४

प्रति,

सन्मा.श्री/श्रीमती-------------------------
सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

या सूचनेव्दारे आपणास कळविण्यांत येते की, ठाणे महानगरपालिकेची **सर्वसाधारण** सभा **गुरुवार दिनांकः १९ जून २०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता** ठाणे महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सभा सूचना क्रमांक ०२ दि १०.०६.२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली आहे.

तरी सदर सभेस कृपया आपण उपस्थित रहावे ही विनंती.

**मा.महापौर साो.यांचे मंजुरीने.**

( **अशोक बुरपल्ले** )
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**<u>सभा सूचना क्रमांक ०२ दिनांक : १०/०६/२०१४ रोजीची विषयपत्रिका.</u>**

**<u>प्रश्नोत्तरे</u>**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| ०३ | ठाणे महानगरपालिकेच्या दि.१९/१२/२०१४ व दि. २४/१/२०१४ रोजीच्या सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत. |
| ०४ | सन्मा.नगरसेवक श्री.राम हरी एगडे यांना अनर्ह करण्याबाबतचे प्रकरण मा.न्यायाधीशांकडे वर्ग करणेबाबत. |
| ०५ | सन्मा.नगरसेविका सौ.विमल अर्जुन भोईर यांना अनर्ह करण्याबाबतचे प्रकरण मा.न्यायाधीशांकडे वर्ग करणेबाबत. |
| ०६ | ठाणे महानगरपालिका प्रभाग क्र. ४३/ब चे सन्मा.नगरसेवक श्री.मनोहर रामा साळवी यांचे अनर्ह करण्याबाबतचे प्रकरण मा.न्यायाधीशांकडे वर्ग करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत. |

| | |
|---|---|
| ०७ | ठाणे महानगरपालिका मालमत्तेच्या सुरक्षिततेसाठी मा.सचिव सुरक्षा रक्षक मंडळ, भांडुप यांचेकडून नियुक्त असणाऱ्या सुरक्षा पर्यवेक्षक व सुरक्षा रक्षकांना मुदतवाढ देणेबाबत व येणाऱ्या अंदाजित खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. |
| ०८ | प्रभाग क्रमांक ५४ मध्ये भोलानगर येथे रेल्वे ट्रॅक जवळील अस्तित्वातील जुने शौचालय निष्कषीत करणेबाबत. |
| ०९ | नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रामधील महात्मा गांधी उद्यान येथे सभोवती संरक्षक भिंत, जाळी, ग्रीलचे काम करणे, कॉंक्रिट पाथवे करणे, बेचेंस बसविणे आणि रंगकाम करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. |
| १० | वागळे प्रभाग समिती कार्यालय इमारतीमधील गाळा क्रमांक १ मे मंडलिक गॅस सर्विस यांना भाडयाने देणेबाबत. |
| ११ | सेक्टर क्रमांक ११, म्युनिसिपल हौसिंग आरक्षण क्र.१ या आरक्षणाचे काही क्षेत्रावर हौसिंग फॉर डिसहाऊस ॲण्ड ट्रान्झीट कॅम्प आरक्षण करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार प्रस्तावित फेरबदल. |
| १२ | महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये मंजूर विकास नियमावली मधील परिशिष्ट डब्ल्यु मध्ये फेरबदल करणेबाबत. |
| १३ | ठाणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये पार्किंग संबंधिचे नियमात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत. |
| १४ | ठाणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील भाग क्र.६ नियम क्र.९३ ते ९६ व त्या अनुषंगाने इतर नियमात मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत. |
| १५ | ठाणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तात्पुरत्या बांधकामा बाबतच्या नियम क्र.२३ (३) मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत. |
| १६ | ठाणे महापालकेच्या वर्तकनगर व माजिवडा मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत पाणी पुरवठा व्यवस्थेचे विस्तार व मजबुतीकरण करणे. तसेच मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत मानपाडा ते गायमुख पर्यनतच्या परिसरात भुयारी गटार योजना एकत्रितपणे राबविणे व या कामासाठी १० वर्षाच्या कालावधीकरीता देखभाल दुरुस्ती व परिचालन करणे. |
| १७ | कोपरी प्रभाग समितीमधील प्र क्र ५२ मधील मोकळया भूखंडावर ॲथलॅटीक ट्रॅक तयार करणेबाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. |
| १८ | घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील सन २०१४-२०१८ या आर्थिक वर्षासाठी सेवांचे दर निश्चित करणेबाबत. |
| १९ | ठाणे महापालिकेच्या तरण तलावांच्या शुल्क दरात वाढ करणेबाबत धोरणात्मक निर्णयासाठी सादर. |
| २० | महापालिकेच्या JNNURM प्रकल्पांतर्गत विविध कामांसाठी MMRDA यांचेकडून रु. ४०८ /- कोटींचे मंजूर असलेल्या कर्जापैकी उर्वरित कर्ज रक्कम रु. १४९.५४ कोटी घेण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर. |

| | |
|---|---|
| २१ | MRUC मार्फत प्रस्तावित ठाणे रेल्वे स्थानक पूर्व भागांतील मध्य रेल्वेच्या जागेचा अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकासह विकसन करणेच्या प्रस्तावातील विकास हक्क महापालिकेमार्फत विकत घेण्याबाबत. |
| २२ | JNNURM प्रकल्पांतर्गत BSUP योजनेसाठी कर्जरुपाने हुडको यांजकडून निधी उपलब्धतेबाबत. |
| २३ | ठाणे महानगरपालिकेच्या टेमघर येथील जलशुध्द्रीकरण केंद्राकरीता क्लोरीन गॅसचा पुरवठा करणेबाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. |
| २४ | जय भवानी नगर येथून श्रीनगर जलकुंभाकडे थेट पाणीपुरवठा करणे या योजनेमध्ये सुधारणा करणेसाठी ६०० मि मि व्यासाची इनलेट जलवाहिनी टाकणेबाबत मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. |
| २५ | जाहिरात विभागाकडील दर निश्चित करणेबाबत.. |

( **अशोक बुरपल्ले** )
महापालिका सचिव
ठाणे महानगरपालिका,ठाणे

सचिव कार्यालय
ठाणे महानगरपालिका,ठाणे
दि.१०/०६/२०१४

**सोबत : १. महाराष्ट्र शासन राजपत्र : असाधारण भाग : १ कोकण विभागीय पुरवणी मार्च ४,२०१४/फाल्गुन १३ शके १९३५ (क्लस्टर डेव्हलपमेंट)**

**२. ठाणे महानगरपालिका,ठाणे सन २०११-२०१२ जमाखर्च,ताळेबंद व लेखाटिपणी.**